# आलोक जत्राटकर यांना पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे



जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांना 'वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र' विषयामध्ये शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली आहे. त्यांनी 'दलित मुक्तीचा प्रश्न : ब्राह्मणेतर आणि दलित वृत्तपत्रांच्या भूमिकेचा तुलनात्मक अभ्यास' यावर शोधप्रबंध सादर केला. डॉ. रत्नाकर पंडित यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

Hello Kolhapur
Page No. 6 Apr 15, 2019
Powered by: erelego.com

# उच्च शिक्षण व्हावे सुदृढ

## शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा 'मटा कट्ट्या'वर सूर

**कोल्हापूर टाइम्स टीम**

'कुठल्याही राष्ट्राची खरी संपत्ती तरुणाई असते. त्या संपत्तीची जपणूक करणे ही सरकारची जबाबदारी आहे. सध्याचे सरकार काही प्रमाणात तरुणाईच्या अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडले आहे. मात्र येणाऱ्या सरकारने तरुणाईसाठी रोजगार निर्मिती, कौशल्य विकास उपक्रम राबवावेत. शेतकऱ्यांचे, सैनिकांचे प्रश्न सोडवण्यासह उच्च शिक्षणासाठी भरीव निधीची तरतूद करावी' अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. 'मटा कट्टा' उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रश्नांना वाट मोकळी करुन दिली.

विजय कोळेकर म्हणाला, 'सध्याच्या सरकारने डिजिटल इंडियाच्या माध्यमातून कॅशलेश व्यवहार करण्यासाठी चांगल्या पद्धतीने प्रयत्न केला आहे. आधीच्या सरकारच्या विविध योजना मार्गी लावण्याचे काम सरकारने केले आहे. येणाऱ्या काळात सरकारने पेट्रोलचा जीएसटीत समावेश करावा. इंधनातील इथेनॉलची टक्केवारी वाढवावी. शेतकऱ्यांच्या शेतमालाला दर द्यावा. रोजगार निर्मितीबरोबर तरुण उद्योजकांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा करावा. शैक्षणिक कर्जावरील व्याज कमी करावे.'

'कुठल्याही सरकारने काळा पैसा परत आणण्यासाठी खंबीर भूमिका घेतलेली नाही. नव्या सरकारने विदेशातील काळा पैसा परत आणून त्याचा वापर देशातील विकासाच्या विविध योजना राबवण्यासाठी करावा. शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देण्यापेक्षा शेतीच्या विकासासाठी धोरणात्मक काम करावे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांच्या मालाला भाव व कर्जपुरवठा करावा सहकार क्षेत्राला उत्तेजना द्यावी' अशी अपेक्षा रत्नशिल कांबळेने व्यक्त केली.

धनंजय शेटके म्हणाला, 'नव्या सरकारचे महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी संपवणे प्रश्न सोडवणे हे धोरण हवे. सध्याच्या सरकारने केलेल्या एअर व सर्जिकल स्ट्राइकमुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उंचावली आहे. महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सत्तेवर येणाऱ्या सरकारने महागाई कमी करण्यासाठी धोरणे राबवावीत. प्रत्येक माणसाचे दरडोई उत्पन्न वाढावे यासाठी प्रयत्न व्हावेत कौशल्य विकासावर अधिक भर दिला जावा.'

रोहित मधाळे म्हणाला, 'सरकारकडून कुठलीही अपेक्षा पूर्ण झाली नाही. शिक्षण पूर्ण करूनही अनेकांच्या हाताला काम मिळालेले नाही. २०१४ साली सरकारने दिलेली वचने पूर्ण झालेली नाहीत. येणाऱ्या सरकारने उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांच्या हाताला काम द्यावे. राजकारण्यांसाठी निवडणूक लढवताना शैक्षणिक पात्रता असावी. नोकर भरतीसाठी असलेल्या पवित्र पोर्टलमधील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात.'

'देशाच्या विकासात शेतकरी महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासासाठी योजना राबवाव्यात. गेली ७० वर्षे गरिबी हटावची नुसतीच घोषणा झाली आहे.नव्या सरकारने त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. भ्रष्टाचारावर अंकुश घालावा आणि रोजगार निर्मितीवर भर द्यावा' असे मत अमित पवार याने व्यक्त केले.

रईस मुजावर म्हणाला, 'सरकारने रोजगार निर्मितीकडे अधिक लक्ष द्यावे. कुठल्याही सरकारने धर्मावर केंद्रित राजकारण करू नये. सवर्णांना न मागता आरक्षण देण्यात आले आहे. आरक्षणाची मागणी करणाऱ्या घटकांना न्याय मिळवून द्यावा. शैक्षणिक विकासासाठी अधिक निधीची तरतूद करावी. शैक्षणिक संस्थांतील सरकारी हस्तक्षेप थांबवावा.'

अमित गट्टे




**शिवाजी विद्यापीठातील पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मटा कट्टा उपक्रमात 'लोकसभा निवडणुका व सरकारकडूनच्या अपेक्षा' या मुद्द्यांवर रोखठोक मते मांडली.**

महाराष्ट्र टाइम्स

मटा कट्टा

### या आहेत मागण्या

- तरुणाईच्या कौशल्य विकासावर भर द्यावा
- उच्च शिक्षणासाठी भरघोस निधीची तरतूद करावी
- राजकीय नेत्यांना निवडणूक लढवताना पदवीची अट ठेवावी
- महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्यांची अमलबजावणी त्वरित केली जावी
- शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शाश्वत प्रयत्न व्हावेत
- शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव द्यावा
- शैक्षणिक संस्थातील राजकारण्यांचा हस्तक्षेप थांबवावा
- आरक्षणाबाबतचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत

**“**

**नव्या सरकारने धर्माचे राजकारण करणे टाळावे. सध्याच्या सरकारच्या काळात रुपयाचे अवमूल्यन झाले आहे. 'मेक इन इंडिया' योजना अपयशी ठरली. त्यामुळे नव्या सरकारने तरुणाईचे हात बळकट करण्यासाठी प्रयत्न करावेत. देशातील जनतेने पैसे न घेता मतदान करावे. मुलींच्या शिक्षणासाठी सरकारकडून अधिकाधिक निधीची तरतूद केली जावी. ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात.**

– **अमृता घाटगे**, विद्यार्थिनी

**सध्याच्या सरकारच्या काळात काही चांगल्या गोष्टी झाल्या आहेत. मात्र शबरीमला येथील प्रकरणावर महिलांच्या बाबतीतचा दृष्टिकोन सरकारने बदलणे गरजेचे आहे. महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने सरकारकडून अधिक व्यापक प्रयत्न व्हायला हवा. स्त्रियांवरील अत्याचारात वाढ होत आहे. 'मिटू' सारख्या घटना वाढत आहेत. अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी अधिक कडक कायद्याची गरज आहे.**

– **स्नेहल कदम**, विद्यार्थिनी

**सरकारने जिओ युनिव्हर्सिटी अस्तित्वात नसताना शंभर कोटी अनुदान दिले. आहे. सध्याचे सरकार संविधानाच्या विरोधी काम करते आहे. आरक्षण हटविण्याचा प्रयत्न चालू आहेत. त्यामुळे नव्या सरकारने अशा घटनांना पायबंद घालावा. दिल्लीत केजरीवाल सरकारने ज्या पद्धतीने प्राथमिक स्तरावर शैक्षणिक विकास केला आहे त्याचा अवलंब करावा.**

– **समीर मुजावर**, विद्यार्थी

# आलोक जत्राटकर यांना पीएच.डी.



**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांना वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयामध्ये शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली आहे. जत्राटकर यांनी 'दलितमुक्तीचा प्रश्न: ब्राह्मणेतर आणि दलित वृत्तपत्रांच्या भूमिकेचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. अशोक चौसाळकर व डॉ. एन. डी. जत्राटकर यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2019

तरुण भारत

# आलोक जत्राटकर यांना पीएच. डी. प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांना वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयामध्ये शिवाजी विद्यापीठाची पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात झाली. त्यांनी 'दलितमुक्तीचा प्रश्न: ब्राह्मणेत्तर आणि दलित वृत्तपत्रांच्या भूमिकेचा तुलनात्मक अभ्यास" या विषयावर शोधप्रबंध सादर केला आहे. या विषयासाठी त्यांना वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. जत्राटकर हे वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयातून नेट व सेट परीक्षाही उत्तीर्ण झाले आहेत. तसेच त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. एन. डी. जत्राटकर यांचे प्रोत्साहन लाभले.

